# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**खानापूर चित्ता (जि.परभणी) येथील मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभाराबाबत**

**(१) १६४ (२२-१२-२०१४). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर चित्ता (जि.परभणी) येथील मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभाराबाबत तक्रार करण्यात आली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :**(१) होय.

(२) परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा खानापूर चित्ता वाढीव कर्ज देत नाही अशी तक्रार प्राप्त झाली असता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांनी संबंधित बँक शाखा व्यवस्थापक यांना आपल्या स्तरावर सुचना दिल्यानंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा खानापूर चित्ता अंतर्गत मागणी प्रमाणे ११ संस्थांच्या ८९२ सभासदांना रु.५३.९२ लाख एवढे कर्ज मंजूर करुन वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा संचलनालयातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धांमध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात**

**(२) ४६२ (२२-१२-२०१४). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५५२ शासकीय आश्रम शाळामधुन सुमारे १ लाख ८७ हजार २१६ विद्यार्थी व

अनुदानीत ५५७ आश्रम शाळामधून सुमारे २ लाख १० हजार ८७४ विद्यार्थी शिक्षण घेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आश्रमशाळांना शालेय शिक्षण विभागाऐवजी आदिवासी विभागाची मान्यता असल्याने शासनाच्या क्रीडा संचालनालया तर्फे आयोजित करण्यात येणा-या विविध क्रीडा स्पर्धा मधून आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना वगळण्यात येते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रम शाळांतील सुमारे ४ लाख विद्यार्थीना २५ गुणांपासून व नोकरी पासून वंचित रहावे लागते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शालेय शिक्षण विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी एकत्र विचार करुन आश्रम शाळांतील गुणवंत खेळाडुंना न्याय देण्यासाठी धोरण निश्चित करण्याबाबत शासन स्तरावरुन कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. विष्णु सवरा (०५-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.२२ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदिवासी विभागाच्या राज्यस्तरिय क्रीडा स्पर्धांना क्रीडा विभागाच्या राज्यस्तरीय स्पर्धांचा दर्जा देण्यात आला आहे. आदिवासी विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होणारे खेळाडू २५ वाढीव क्रीडा गुण सवलतीसाठी तसेच सदर स्पर्धेत पदक प्राप्त करणारे खेळाडू शासन सेवेत खेळाडूंना ठेवलेल्या ५% आरक्षणाच्या सवलतीसाठी पात्र ठरतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिमुर (जि.चंद्रपूर) वन हक्क समितीद्वारा जिल्हा समितीकडे प्रस्तावित केलेल्या प्रलंबित प्रकरणांबाबत

**(३) ३९४३ (२२-१२-२०१४). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर (जि.चंद्रपूर) वन हक्क समितीद्वारा जिल्हा वन हक्क समिती चंद्रपूरकडे माहे २००९ पर्यंत प्रस्तावित केलेले १५९ प्रकरण प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका वन हक्क समितीकडे प्रस्तावित केलेल्या १५९ प्रकरणांच्या मंजुरी व पट्टे वितरणाबाबत मंजुरीस विलंब होण्यामागे सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, वन हक्क पटटे न मिळाल्याने सदर लाभार्थ्यांना शासकीय अन्य योजनांपासून परावृत्त व्हावे लागल्याने दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ च्या सुमारास तालुका वन हक्क समितीद्वारा आंदोलनाचा पत्रव्यवहार संबंधीत अधिकाऱ्यांकडे केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास त्वरित निर्णयाबाबत कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०७-१२-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रकरणी विलंब झालेला नाही.
(३) दिनांक २२/१२/२०१४ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.
(४) विहित कालावधीत कार्यवाही करण्यात येत असल्याने वेगळी उपाययोजना करण्याची आवश्यक नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यात तंत्रशिक्षण देणा-या अनेक संस्थांनी बोगस विद्यार्थी दाखवून करोडो रुपयांची शिष्यवृत्तीची रक्कम हडप केल्याबाबत**

**(४) ५४४७ (०९-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तंत्रशिक्षण देणा-या स्व.राहुलभाऊ बोम्मावार कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड टेक्नॉलॉजी संस्थेचे संचालक सुरज बोम्मावार आणि रोहित बोम्मावार यांनी सन २०१३ व २०१४ या सत्रात १२० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असतानाही २०९ बोगस विद्यार्थ्यांच्या नावाने समाजकल्याण गडचिरोली या कार्यालयाकडून १ कोटी ६ लाख ३१ हजार ५० रुपयांचा गैरव्यवहार केला, तसेच संकल्पसिध्दी बहुउद्देशीय विकास संस्थेचे संचालक अमित बंदे यांच्या सावित्रीबाई फुले ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड टेक्नॉलॉजी कॉलेजने उक्त सत्रात ६९ लाख रुपये, गुरुसाई कॉलेज ऑफ टेक्निकल अॅन्ड मॅनेजमेंट आष्टीने १५ लाख ४५ हजार रुपये, शिवाजी कॉलेज वडसा १९ लाख ५३ हजार रुपये व शिवनेरी कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजीने ७६ हजार रुपये व यांच्यासह अनेक संस्थांनी बोगस विद्यार्थी दाखवून करोडो रुपयांची शिष्यवृत्तीची रक्कम हडप केल्याची माहिती माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण व आदिवासी विभागाच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी, गडचिरोली, वडसा यांसह अनेक पोलिस स्टेशनमध्ये दोन महिन्यापूर्वी रितसर तक्रार देवून सुध्दा सदर पोलिसांनी आरोपींना अद्यापही अटक केलेली नसल्याची माहिती निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नायब तहसिलदार, नागभिड, जि.चंद्रपूर यांच्या नावाने बनावट शिक्के तयार करुन ११० विद्यार्थ्यांच्या नावे बनावट उत्पन्नाचे दाखले तयार करुन शासनाकडे सादर केले असल्याची माहिती चौकशीतून निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, व त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-१२-२०१५) :**(१) प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त बोगस विद्यार्थ्यांच्या नावाने शिष्यवृत्तीच्या रक्कमेचा अपहार करण्याची बाब गडचिरोली जिल्ह्यात निदर्शनास आलेली आहे.

(२) संबंधित महाविद्यालयांविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस विभागामार्फत अधिक तपास सुरु आहे.

---

**चाळीसगांव (जि.जळगांव) येथील जिल्ह्यातील आश्रमशाळा शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे गेल्या चार महिन्यापासून वेतन न मिळाल्याबाबत**

**(५) ५८४४ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगांव (जि.जळगांव) येथील आश्रमशाळा शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे गेल्या चार महिन्यापासून वेतन न मिळाल्यामुळे महाराष्ट्र शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी संघाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील आश्रमशाळांचे गेल्या चार महिन्यापासून वेतन न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०१-२०१६) :**(१) होय.

(२) जळगांव जिल्ह्यात ४१ मान्यता प्राप्त अनुदानित विजाभज आश्रमशाळा असून सदर आश्रमशाळेतील फेब्रुवारी, २०१५ पर्यंत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन समाज सेवार्थ प्रणालीमध्ये अदा करण्यात आले आहे. पुढील वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरात रमाई घरकुल योजनेसाठी शासनाने महानगरपालिकेला तब्बल ३५ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिल्याबाबत**

**(६) ८१९६ (०७-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात रमाई घरकुल योजनेसाठी शासनाने महानगरपालिकेला तब्बल ३५ कोटींचा निधी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरांचे दोन हजारांचे उद्दिष्ट असतांनाही शहरात केवळ १३३ घरांचे काम सुरू असून ते देखील पूर्ण झाले नसल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०१-२०१६) :** (१) होय, अकोला शहरात रमाई घरकुल योजनेसाठी महानगरपालिकेला रु.३८.१८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यता आलेला आहे.
(२) व (३) अकोला शहरामध्ये रमाई घरकुल योजनेचे सन २०१४-१५ अखेर २१२४ इतके उद्दिष्ट असून, १०२५ घरकुले मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यापैकी १२४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. ८७८ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर असून, २३ घरकुले विविध कारणाने रद्द करण्यात आलेली आहेत.

अकोला महानगरपालिकेला घरकुलांच्या उद्दिष्टानुसार पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून, मंजूर घरकुलाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने घरकुल निर्माण समितीकडून नियमित बैठका घेण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची आठ कोटीची रक्कम कपात केली जाणार असल्याबाबत

**(७) ९५०० (१०-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग व मागास प्रवर्गातील ३० हजार विद्यार्थ्यांची आठ कोटीची रक्कम सन २०१५ मध्ये कपात केली जाणार असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रत्येक १० हजार याप्रमाणे ही शिष्यवृत्ती दिली जात होती यामुळे विद्यार्थ्यांना याचा फायदा होता परंतु शिष्यवृत्ती मिळणार नसल्याने सदरहू विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन काय कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१५) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनवट व माहूर (जि.नांदेड) येथील संस्थेने आदिवासी गावांसाठी तसेच समाजाच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी निधी घेऊन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(८) ९८२२ (०९-०४-२०१५). श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट व माहूर (जि.नांदेड) येथील जय बजरंग सेवाभावी संस्था, इस्लामपूर या संस्थेने परिसरातील आदिवासी गावांसाठी तसेच समाजाच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी केंद व राज्य शासनाकडून तसेच नाबार्ड अंतर्गत कोट्यवधी रुपये निधी घेऊन गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०९-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही. जय बजरंग सेवाभावी संस्था, इस्लामपूर या संस्थेला आदिवासी विभागामार्फत कोणत्याही प्रकारे निधी देण्यात आलेला नाही. नाबार्ड संस्थेकडून त्यांच्या योजनेअंतर्गत त्यांचे स्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तथापि, त्याबाबत कोणतीही तक्रार नाबार्डकडे दाखल करण्यात आलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील महामंडळांना वेळेवर निधी मिळाला नसल्याबाबत**

**(९) १२९०१ (१०-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील वसंतराव नाईक भटके विमुक्त महामंडळ, संत रोहिदास चर्मकार महामंडळ, लोकशाहिर अण्णा भाऊ साठे महामंडळ, महात्मा जोतिराव फूले महामंडळ या सारख्या महामंडळाच्या शासनाकडून गेल्या तीन वर्षापासून निधी मिळाला नसल्याचे माहे जाने, २०१५ च्या पहिल्या आठवडयात वा त्यासुमारास उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील शासनाने महामंडळाना २५८ कोटींचा निधी देऊन सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य महिला बचाव समिती यांनी शासनाकडे दि. ६/१/२०१५ रोजी वा त्या सुमारास मोर्चा काढून केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व उपरोक्त महामंडळाना तात्काह निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (१२-०१-२०१६) :**(१) (अ) वसंतराव नाईक महामंडळाकडून कोल्हापूर जिल्ह्याकरीता मागील तीन वर्षात महाराष्ट्र शासनाच्या बीज भांडवल योजनेअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये ६,५०,०००/- व २०१३-१४ मध्ये १५ लक्ष इतका निधी पाठविण्यात आला.

(ब) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास सन २०१३-१४ मध्ये एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्या मुदती कर्ज योजना, महिला समृध्दी योजना, लघुऋण वित्त योजना व महिला किसान योजनेअंतर्गत निधी प्राप्त झालेला नाही. सन २०१४-१५ एकूण १,५२,५२,०००/- रु. निधीचे वाटप करण्यात आले आहे.
(क) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळास सन २०१२-१३ ते २०१४-१५ मध्ये अनुदान योजनेंतर्गत एकूण रु.३५९५.०३/- लक्ष, बीजभांडवल योजनेंतर्गत एकुण रु.१७६२५.००/- लक्ष व एनएसएफडीसी टर्मलोन योजनेंतर्गत एकूण रु.७५३७.५०/- लक्ष इतका निधी देण्यात आला आहे.
(ड) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ महामंडळास सन २०११-१२ पासून एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांचेकडून निधी मिळालेला नाही तसेच एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांचेकडून गेल्या वर्षभरात निधी व मंजूरी मिळालेली नाही.
(२) होय.
(३) निधी उपलब्ध करुन देण्यात आला असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवतनाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपुर्व शिक्षणासाठी केंद्र पुरस्कृत १०० टक्के शिष्यवृत्ती योजना लागू करण्याबाबत**

**(१०) १४५८० (०९-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपुर्व शिक्षणासाठी केंद्र पुरस्कृत १०० टक्के शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र सरकारतर्फे या योजनेसाठी राज्य शासनाला काही अनुदान प्राप्त झाले होते काय, असल्यास, सन २००३ पासून किती विद्यार्थ्यांना याचा लाभ देण्यात आला व सदरील अनुदान इतरत्र वळवण्यात आले असल्यास संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच उक्त विद्यार्थ्यांना केंद्र पुरस्कृत १०० टक्के शिष्यवृत्ती योजना लागू करून शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-१२-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) राज्य शासनाने सदर योजना लागू केलेली नाही. तथापि, सदर योजनेसाठी सन २००९-१० या आर्थिक वर्षात रुपये ५१८.३० लाख इतके केंद्रीय अनुदान प्राप्त झाले होते. राज्यातील विजाभज/विमाप्र संवर्गातील यादीतील जाती भारत सरकारच्या इमाव संवर्गातील यादीमध्ये अंतर्भूत असून त्यांच्यासाठी राज्याची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना लागू आहे.

त्यानुसार केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील तलासरी व डहाणू तालुक्यातील फॉरेस्ट प्लॉट आदिवासींच्या नावे झालेले असून प्रत्यक्षात वनधारक यांच्या ताब्यात दोन एकर पेक्षा जास्त जमीन असताना त्यांचे नावे विभागाने दोन गुंठे इतकी जमीन नावावर केली असल्याबाबत**

**(११) १५५०६ (०९-०४-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील तलासरी व डहाणू तालुक्यातील फॉरेस्ट प्लॉट आदिवासींच्या नावे झालेले आहेत परंतु प्रत्यक्षात वनधारक यांच्या ताब्यात दोन एकर पेक्षा जास्त जमीन असताना त्यांचे नावे विभागाने दोन गुंठे इतकी जमीन नावावर केली असून दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली,
(४) असल्यास, आदिवासींच्या ताबाप्रमाणे सदरचे प्लॉट केव्हा नावे होतील,
(५) नसल्यास, सदर प्लॉट नाव होण्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. विष्णु सवरा (०७-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
तथापि, मार्च, २०१५ अखेरपर्यंत वनहक्क कायद्यानुसार पालघर जिल्हयात ३०४६१ वैयक्तिक वनहक्क दावे मंजूर झालेले असून त्यापैकी तलासरी तालुक्यात १९१७ दाव्यांसाठी १००९ एकर व डहाणू तालुक्यात ५३६५ दाव्यांसाठी १६९४ एकर क्षेत्र मंजूर झालेले आहे. तसेच जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त असलेली कमी क्षेत्राबाबतची सर्व प्रकरणे उपविभागीय स्तरीय समितीकडे पुर्नचौकशीसाठी पाठविण्यात आली असून कार्यान्वित आहेत.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सन २०१२-१३ वनहक्क कायद्याअंतर्गत आदिवासी शेत जमिन सुधारणा कामात झालेला गैरव्यवहार**

**(१२) १६१३८ (०९-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सन २०१२-१३ वनहक्क कायद्याअंतर्गत आदिवासी शेत जमिन सुधारणा कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी सपाटीकरण व वाडा प्रकल्पाचे काम न करता आदिवासी लाभार्थ्यांच्या फसवणुक दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अद्याप, याबाबत कारवाई करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ पदवी अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत देण्याबाबत**

**(१३) १६१६९ (०९-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेल्यावर्षी ज्या अनुसूचित जाती आणि जमातीतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात बी.एस.सी.आय.टी आणि बी.एफ.एम. या अभ्यासप्रमासाठी प्रवेश घेतला त्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ समाजकल्याण खात्याकडून देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये समाजकल्याण खात्याकडून कळविण्यात आले आहे की, बी.एस.सी.आय टी या अभ्यासक्रमातील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना वगळता इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(४) तदनुसार शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मध्ये ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या योजनेंतर्गत प्रवेश घेतला आहे त्यांना ह्या योजनेचा लाभ पदवी अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०१-२०१६) :** (१) बी.एस.सी.(आय.टी.) सारख्या नवीन अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येतो.
(२), (३) व (४) इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या सद्याच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेत बी.एस.सी. (आय.टी.) सारख्या अभ्यासक्रमांचा समावेश नाही. सदर अभ्यासक्रमांचा समावेश सदर योजनेत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्णबधिर मुलांना अपंगांसाठीच्या शाळेमधून शिक्षण घ्यावे लागत असल्याबाबत**

**(१४) १६३४९ (०६-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्णबधीर मुलांचा दहावीचा अभ्यासक्रम अत्यंत दुय्यम प्रतीचा असून एक भाषा, लोअर मराठी, सातवीचे अंकगणित परंतु एकूण विषय चौदा कमी अधिक गुणांचे, कमी प्रतीच्या भाषेमुळे त्यांना चांगले लिहिता येत नाही, वाचन जमत नाही त्यामुळे भाषिक ज्ञानच कमी मिळत असून अपंगासाठीच्या शाळेमधूनच त्यांना शिक्षण घ्यावे लागते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंगाच्या संस्था त्यांच्यासाठी जेथे जॉब फेअरचे आयोजन करतात तेथे अंध, शारिरीक विकलांगाची निवड होते, कर्णबधीर मात्र मागे पडतात हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्णबधीरांच्या शाळा शासनाचे शिक्षण खात्याकडुन न चालवता त्या सामाजिक न्याय विभागाकडून चालविण्यात येत असल्याने कर्णबधीरांच्या गरजानुसार शैक्षणिक धोरणतत्वे, शिक्षण पध्दती, शिक्षणाचे माध्यम, कर्णबधीरांच्या बौधिक विकासात येणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष होते हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीला शिक्षणाची क्षितिजे रुंदावत असतांना शिक्षण पध्दती, माध्यमे, नवनवीन रुप धारण करीत असतांना कर्णबधीरांचे शिक्षण दुर्लक्षित राहिल्यामुळे कर्णबधीरांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) अपंगांचा अनुशेष भरुन काढण्याबाबत शासनाने वेळोवेळी शासन निर्णय व परिपत्रके निर्गमित केलेली आहेत. तसेच अपंगांची सरळसेवेकरीता एकूण अपंग ५६३९ पैकी अंध-१०२०, अस्थिव्यंग-९७२, कर्णबधीर-८७६ अशा एकूण २८६८ रोजगारांना रोजगार उपलब्ध झालेला असून याबाबतची तुलना केली असता कर्णबधीर असलेली व्यक्ती रोजगारापासून मागे पडत नसल्याचे स्पष्ट होते.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत खाजगी सावकारांकडील कर्जमाफीचा प्रस्ताव**

**(१५) १६८४९ (१९-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत खाजगी सावकारांकडील कर्जमाफीचा सरकार आदेश अखेर जारी करण्याकरिता शासनाने ४ महिन्याचा कालावधी लावला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव खाजगी सावकारी हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मुळ कारण असुनही याबाबत आदेश जारी करण्याकरिता शासनाने ४ महिने विलंब केल्याने या काळात होणाऱ्या आत्महत्या टाळता आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०१-२०१६) :** (१) नाही.

विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) कर्जमाफी करण्याबाबतच्या शासन निर्णयातील तरतूदी/अटी-शर्ती व निकष नुसार सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे सामाजिक न्याय विभागाअंतर्गत शासकीय निवासी आश्रमशाळा व वसतीगृहांमध्ये पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत**

**(१६) १६९६७ (३०-०७-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे सामाजिक न्याय विभागाअंतर्गत शासकीय निवासी आश्रमशाळा व वसतीगृह या इमारतीचे बांधकाम करण्यात आले. मात्र तेथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पाण्याची सुविधा नसल्यामुळे आश्रमशाळा व वसतिगृहासाठी पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांना दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-१२-२०१५) :**(१) होय.

(२) वसतिगृह इमारतीचा ताबा सहायक आयुक्त, समाजकल्याण, अमरावती कार्यालयास प्राप्त झाला असून सदर इमारतीत तात्पुरत्या स्वरुपात पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचे वसतिगृह शासकीय इमारतीत स्थलांतरीत झालेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हद्दगाव तालुक्यात (जि.नांदेड) येथे शेतक-यांच्या अनुदान वाटपात पारदर्शकता आणण्याबाबत**

**(१७) १७०९६ (०५-०९-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हद्दगाव तालुक्यात (जि.नांदेड) येथे नापिकी झाल्यामुळे शासनाकडून शेतक-यांना अनुदानाचा पहिला टप्पा (९० कोटी) बँकेत जमा झाला असून त्याचे वाटप जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत चालू आहे, या वाटपात साधारण शेतक-यांना दुजाभाव केला जात असून बड्या शेतक-यांना घरपोच अनुदान मिळत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणाची चौकशी करुन शेतक-यांच्या अनुदान वाटपात पारदर्शकता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :**(१) नाही, हे खरे नाही.

हदगाव तालुक्यात नापीकी झाल्यामुळे शासनाकडून निधी वाटप करण्यासाठी तहसिल कार्यालयाकडून ६२८७४ शेतकऱ्यांसाठी रक्कम रुपये ३१२५.२१ लाख बँकेस प्राप्त झालेले होते. त्यापैकी ६२८७४ शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम रु.३१२५.२१ लाख जमा करण्यात आली आहे. सदर निधीचे तहसिल कार्यालयाच्या सुचनेनुसार Z ते A या मुळाक्षरांनी चालू होणाऱ्या गावाच्या नावाच्या क्रमानुसार वाटप करण्यात आले असुन, शेतकऱ्यांना करण्यात आलेल्या वाटपात कुठलाच दुजाभाव केला गेलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील जिल्हावार जात पडताळणी समित्यांचे कामकाज सुरु न झाल्याबाबत**

**(१८) १७६१२ (१०-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील जात पडताळणी समित्यांवर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची नियुक्तीच न झाल्यामुळे जिल्हावार जात पडताळणी समित्यांचे कामकाज सुरु झालेले नसल्याचे माहे २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राखीव जागांवर प्रवेश, नोकरी, प्रमोशन व निवडणूकांतील उमेदवारांना जातीचे प्रमाणपत्र आणि जात पडताळणीचे प्रमाणपत्र सादर करावे लागते, त्यामुळे जात पडताळणी प्रमाणपत्रांसाठी प्रचंड संख्येने अर्ज आल्याने प्रमाणपत्रे देण्याचे काम रखडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे, वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०१-२०१६) :**(१) नाही. विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.३ पुणे या समितीवर अध्यक्ष व सदस्य सचिव ही दोन्ही पदे नियमितरित्या कार्यरत आहेत.

शासनाने सध्याच्या १५ विभागीय जात प्रमाणपत्र समित्यांऐवजी जिल्हानिहाय ३६ समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला असून, जिल्हानिहाय ३६ समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला असून, जिल्हानिहाय समित्यांसाठी पदनिर्मिती प्रस्तावित असल्याने, अद्याप सदर समित्या कार्यान्वित झालेल्या नाहीत.
(२) नाही.

सप्टेंबर, २०१५ अखेर पुणे समितीकडे केवळ २८३७ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(३) शैक्षणिक तसेच निवडणूक विषयक प्रकरणे खास मोहिमेद्वारे निकाली काढण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील अंध अंपगांना संजय गांधी पेन्शन योजना, रेशनिंग विभागाच्या योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(१९) १७९४९ (३०-०७-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील अंध अंपगांना संजय गांधी पेन्शन योजना, रेशनिंग विभागाच्या योजनांचा लाभ प्राधान्याने मिळावा व इतर मागण्यांसाठी शिष्टमंडळाने दिनांक ११ मे, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांची भेट घेऊन तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच अंध व अंपगाच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

**श्री. राजकुमार बडोले (०५-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रकरणानुषंगाने केलेल्या मागण्यांचे स्वरुप व त्यानुषंगाने केलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे.

अ) वांगणी ता.अंबरनाथ येथील अंध व्यक्तींच्या संजय गांधी योजनेचे अनुदानासंदर्भातील बाबी.

ब) वांगणी ता.अंबरनाथ येथील अंत्योदय योजनेच्या अंध अपंगांना पिवळी शिधापत्रिका मिळण्यासंदर्भातील बाबी.

क) जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी अपंगाचा ३ टक्के निधी खर्च केला किंवा नाही व त्यासंदर्भातील बाबी.

प्रकरणाधीन ५५ अंध व्यक्तींपैकी ५३ अंध व्यक्तींना अंत्योदय अन्न योजनेच्या पिवळया शिधापत्रिका देण्यात आल्या असून त्यांना माहे जून, २०१५ पासून अन्नधान्य व इतर वाटप करण्यात येत असून उर्वरीत २ अंध व्यक्तींकडून कागदपत्रांची पूर्तता होताच त्यांनासुध्दा योजनेअंतर्गतचा अनुज्ञेय लाभ देण्यात येईल तसेच संजय गांधी योजना, श्रावणबाळ सेवा व इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजनाअंतर्गतचा लाभ सर्व लाभार्थ्यांना देण्यता येत असून सद्यस्थितीत कोणताही लाभार्थी लाभापासून वंचित नाही व त्याबाबतच्या सूचना संबंधित बँकेला देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थाकडून ३ टक्के अपंग कल्याण निधीची तरतूद करण्यात आली आहे.

---

## सहकारी साखर कारखान्यांच्या राज्यसहकारी बँकेने सुरु कारखाने विक्रीवर कारवाईस स्थगीतीचे आदेश दिल्याबाबत

**(२०) १९२३१ (२१-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे २२०० कोटीच्या रुपयांच्या थकबाकी वसुलीसाठी ३२ सहकारी साखर कारखान्यांच्या राज्यसहकारी बँकेने सुरु केलेल्या कारखाने विक्रीवर शासनाने दिनांक १० सप्टेंबर, २०13 रोजी स्थगिती आदेश दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थगिती आदेश धुडकावून राज्य सहकारी बँकेने ३२ कारखान्यांच्या विक्रीची प्रक्रीया चालू केली असून ४ कारखान्यांची विक्रीही केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विक्री केलेले कारखाने कोणास व किती रुपयास विकण्यात आले याची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाचे आदेश न पाळणाऱ्या राज्य सहकारी बँकेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) लागू नाही.
(४) लागू नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर (जि.पुणे) येथील शासकीय प्रमाणित मुलींचे बालगृह या संस्थेला सन २०१४-१५ चे अनुदान मिळणेबाबत**

**(२१) १९२६७ (१७-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शासकीय प्रमाणित मुलींचे वरिष्ट व कनिष्ट बालगृह सन १९९७ पासून कारमेलोदिया सी.एस.सी. एज्युकेशन सोसायटी सावंगी मेघे, वर्धा संचलित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय प्रमाणित मुलींचे बालगृह सन २०१३ पर्यंत महिला बालकल्याण विभागाकडे होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हे बालगृह दिनांक १ जून, २०१३ रोजी च्या नोंदणी प्रमाण पत्रानुसार सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय प्रमाणित मुलींचे बालगृह शिरुर यांना सन २०१४-१५ चे अनुदान आजपर्यंत मिळाले नाही, हे खरे आहे काय

(५) असल्यास, शिरुर येथील शासकीय प्रमाणित मुलींचे बालगृह या संस्थेला सन २०१४-१५ चे अनुदान मिळणे बाबत व वसतीगृहाची नवीन मंजूर इमारतीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासन स्तरावर केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रया ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०१-२०१६) :** (१) व (२) होय.
(३) महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय दि.३०.५.२०१५ व दि.१०.५.२०१३ अन्वये मतिमंद बालगृहे सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील संस्थेच्या वेतनेत्तर अनुदान रक्कम रु.१३ लाख ५६ हजार दि.९.११.२०१५ अन्वये मंजूर करण्यात आलेले आहे.

---

**राज्यातील भिल पारधी व इतर भटक्या जाती लोकांना जाती दाखला पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याबाबत**

**(२२) १९२९२ (३०-०७-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातीचा दाखला कुटूंबातील एका व्यक्तीचा नावाचा असेल तरी कुटूंबातील इतरांना रेशनकार्डप्रमाणे स्मार्ट कार्ड उपलब्ध करुन देऊन जातीचा दाखला मिळण्याची प्रक्रिया सुलभ

केली जाईल असे आश्वासन मा.सामाजिक न्याय राज्यमंत्री महोदयांनी दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील भिल पारधी समाजातील लोकांना व इतर भटक्या जातीमध्ये लोकांना जातीच्या दाखला पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल असे मा.सामाजिक न्यायमंत्री महोदयांनी जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-१२-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर विषयाबाबतच्या लक्षवेधी सूचनेवरील दि.२५/३/२०१५ रोजी विधानसभेत झालेल्या चर्चेदरम्यान यासंदर्भात शासनाच्या संलग्न विभागांसोबत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

(३) प्रत्येक जाती दावा स्वतंत्रपणे त्याच्या गुणवत्तेच्या आधारे तपासण्यात यावा असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असल्याने प्रत्येक कुटुंबाला एकत्रित जात प्रमाणपत्र देण्याबाबतच्या प्रस्तावास विधी व न्याय तसेच आदिवासी विकास विभाग यांनी मान्यता दिलेली नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत कुटुंबाला एकत्रित जातप्रमाणपत्र देण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ४७० सहकारी पतसंस्था आर्थिक अडचणीत आल्याबाबत**

**(२३) १९४७५ (१९-०८--२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील असलेल्या सहकारी पतसंस्थापैकी, सुमारे ४७० पतसंस्था या आर्थिक अडचणीत असल्याने सर्वसामान्य ठेवीदारांच्या ठेवी अडकून पडल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पतसंस्थावरील संचालकांचा गैरव्यवहार, गैर पध्दतीने कर्जवाटप इत्यादी कारणांमुळे पतसंस्था अडचणीत आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पतसंस्थांची चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, दोषी संचालकांवर कारवाई करण्याचे निर्देश न्यायालयाने शासनाला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर पतसंस्थांवर व संचालकांवर कोणती कारवाई केली आहे व सदर पतसंस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी व ठेवीदारांच्या ठेवी मिळणेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०१-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

चौकशी पूर्ण झालेल्या पतसंस्थांमध्ये संचालकांचा गैरव्यवहार, गैरपध्दतीचे कर्जवाटप कामकाज इत्यादी आढळून आले.

(४) याबाबत सरसकट कारवाई करण्याचे आदेश मा.न्यायालयाने दिल्याचे दिसून येत नाही.

(५) अडचणीत आलेल्या ४६९ पतसंस्थापैकी १९१ पतसंस्थांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशीचे कामकाज चालू असून चौकशी पूर्ण १४१ पतसंस्थांमधील दोषी संचालकांवर जबाबदारी निश्चित करुन जबाबदारी निश्चित झालेल्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे. शासन निर्णय दि.४.८.२००९ अन्वये अडचणीतील पतसंस्थांना शासनाने मंजूर केलेल्या अर्थसहाय्यपैकी राज्यातील २२ जिल्ह्यातील ३३९ पतसंस्थांनी पात्र ठेवीदारांना रु.१७३.४९ कोटीचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर शहरात संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना शासनाकडून येणारी रक्कम वेळेवर मिळत नसल्याबाबत**

**(२४) २०२९५ (०६-०८-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरात संजय गांधी निराधार योजनेतील सुमारे चार हजार लाभार्थ्यांना शासनाकडून येणारी रक्कम वेळेवर मिळत नसल्याने अपंग सेवा संघाच्या पुढाकाराने तहसील कार्यालयावर एप्रिल २०१५ मध्ये वा त्यासुमारास धडक मोर्चा काढल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोर्चा दरम्यान या योजनेत सुरु असलेला भ्रष्टाचार लाभार्थ्यांनी निदर्शनास आणला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भ्रष्टाचाराची शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून झाले व त्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे. अपंग सेवा संघ उल्हासनगर यांचे दि.२७.०४.२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनात संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गतचे फेब्रु.२०१५ ते मे, २०१५ या कालावधीचे अनुदान तात्काळ देण्यात यावे अन्यथा उपोषण करण्यात येईल असे नमूद केले होते. त्यास अनुसरुन सदर कालावधीतील अनुदान तात्काळ देण्यात यावे अन्यथा उपोषण करण्यात येईल असे नमूद केले होते. त्यास अनुसरुन सदर कालावधीतील अनुदान लाभार्थ्यांना वाटप केलेले आहे.

(२) खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**स्नेहालय संचलित अनामप्रेम संस्थेच्या सेवा कामांचा प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) २०४६५ (३०-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्नेहालय संचलित अनामप्रेम संस्था अहमदनगर यांचा निवासी स्वरुपाच्या सेवा कामांचा प्रस्ताव राज्याच्या समाजकल्याण विभागाकडे सन २०१४ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा सहकारी बँक कर्मचारी संघटनेच्या मागण्यांबाबत**

**(२६) २०४९० (१९-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा सहकारी बँक कर्मचारी संघटनेच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) दि.०१/०७/२०११ पासून केंद्र शासनाच्या महागाई भत्ता दराने महागाई भत्ता मिळणेबाबत संघटनेची मागणी होती, पैकी दि.०१/०४/२०१५ ला २१ टक्के दराने महागाई भत्ता पूर्वीच अदा केला होता. महागाई भत्त्यात आणखी वाढ मिळण्याकरीता दि.११/०५/२०१५ पासून कर्मचारी संपावर गेले होते. संघटनेच्या मागणीप्रमाणे चर्चा करण्याकरीता दि.०८/०५/२०१५ चे संचालक मंडळ सभेत उपसमितीची स्थापना होऊन त्याच्या तिन सभा झाल्या परंतु त्यामध्ये तडजोड

झाली नाही. दि.१९/०५/२०१५ रोजी संचालक मंडळ सभेमध्ये १५ टक्के दराने महागाई भत्ता देण्याचे मंजूर झाले. परंतु संघटनेने मान्य न केल्यामुळे दि.२०/०५/२०१५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली संघटना, शासन व कर्मचारी प्रतिनिधी यांच्यामध्ये १५ टक्के दराने महागाई भत्त्यात वाढ देण्यावर सहमती झाली आणि तद्नंतर बँकेच्या संचालक मंडळाची सभा दि.२५/०७/२०१५ मध्ये १५ टक्के दराने महागाई भत्ता दि.०१/०७/२०१५ पासून वितरीत करण्याचा ठराव पारीत होऊन ठरावाची अंमलबजावणी करण्यात आली.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा बँक व्यवसाय**
**परवाना रद्द करण्यात आल्याबाबत**

**(२७) २१०७४ (१९-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा बँक व्यवसाय परवाना रद्द झाल्यामुळे अनेक खातेदारांचे पैसे त्यामध्ये अडकुन पडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा खातेदारांची संख्या व रक्कम किती व त्यासाठी शासनाने बँकेला वित्तीय सहाय्य केले आहे काय तसेच थकीत असलेल्या रक्कमेचा खातेदारांना परतावा करण्याच्या संदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दि.३१/०६/२०१५ अखेर ३६३९१३ खात्यांमध्ये रु.५१८२८.२१ लाख बँकेकडे जमा आहेत. शासनाकडून रु.१३७०९.०० लाख वित्तीय सहाय्य प्राप्त झाले आहे. दि.०५/०९/२०१४ रोजीच्या रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार व्यवहार करण्यास निर्बंध असल्याने ठेवीदारांची रक्कम परत करता येत नाही. उक्त आदेशाविरुध्द प्रकरण मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुविकास बँक अकोला जिल्हा येथील ७८ सेवा निवृत्त कर्मचा-यांना अतिरिक्त महागाई भत्ता इतर रक्कम देण्याबबत**

**(२८) २१४३१ (१३-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुविकास बँक अकोला जिल्हा येथील ७८ सेवा निवृत्त कर्मचा-यांना अतिरिक्त महागाई भत्ता इतर रक्कम देण्याबबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ च्या दुस-या

आठवड्यात निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००८ मध्ये अवसानायात निघालेल्या बँकेच्या ७८ कर्मचा-यांची थकीत रक्कम प्रायमरी बँकेने देण्याबाबत आदेश असतानांही त्यांची रक्कम अदा केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर थकीत रक्कम ह्या कर्मचा-यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०१-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) भू-विकास बँकांबाबत मंत्रीमंडळ उपसमितीच्या शिफारशीनुसार दि.१२.०५.२०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून त्याअनुषंगाने दि.२४.०७.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे या शासन निर्णयानुसार बँकेच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित नांदेड या बँकेला ११८.५० कोटी रुपयांचे असमर्थनीय अर्थसहाय्य केल्याबाबत**

**(२९) २१४८३ (०५-०९-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित नांदेड या बँकेने शेतकऱ्यांना पीक कर्जे देण्यासाठी महाराष्ट्र मंत्रीमंडळ समितीने २०० कोटींचे कर्ज दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कालांतराने त्या कर्जाचे शासकीय भागभांडवलाचे अनुदानात रुपांतर करणे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बँकेला ११८.५० कोटी रुपयांचे असमर्थनीय अर्थसहाय्य करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :**(१) बँकेने शासनाकडे पाठविलेल्या आर्थिक मदतीच्या प्रस्तावा आधारे रुपये २०.०० कोटी शासकीय भागभांडवलापोटी दि.२८.०३.२००७ नुसार दिले तसेच महाराष्ट्र शासनाने रुपये १००.०० कोटी ६ टक्के व्याजदराने दिनांक १४.०३.२००८ नुसार कर्ज स्वरुपात दिले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाने रुपये १००.०० कोटी ६ टक्के व्याजदराने दिनांक १४.०३.२००८ नुसार कर्ज स्वरुपात दिले होते. सदरील रक्कम बँकेस वापरता येत नव्हती. कर्ज स्वरुपात रक्कम असल्यामुळे बँकेच्या नक्त मुल्य व सीआरएआर मध्ये काही सुधारणा होऊ शकत नव्हती. बँकेचे बँकींग नियमन कायदा १९४९ चे कलम ११(१) चे पालन करुन बँकींग परवाना मिळण्यास पात्र व्हावी, बँकेच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा व्हावी व शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करता यावे तसेच रिझर्व्ह बँकेचे सदर बँकेवरील निर्बंध शिथिल होऊन बँक पुर्ववत चालू व्हावी यासाठी शासनाने शासन निर्णय दि.१०.०८.२००९ नुसार उपरोक्त रु.१०० कोटी कर्ज व्याजासह पुर्वलक्षी प्रभावाने अनुदानात रुपांतरील केले. तसेच शासकीय भागभांडवल रु.२० कोटी पैकी शासनाने दि.०१.१२.२००८ ला रु.१० कोटी बिनव्याजी ठेवीत रुपांतरीत करण्याची मान्यता दिली. दि.१०.०८.२००९ रोजी बिनव्याजी ठेवीचे रु.१० कोटी अनुदानात रुपांतरीत केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वाकोला शाखा**
**अनधिकृत इमारतीत कार्यरत असल्याबाबत**

**(३०) २२२२४ (१३-०८-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वाकोला शाखा अनधिकृत इमारतीत कार्यरत असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सर्व नियमांचे उल्लंघन करून दातार अपार्टमेंट, राजेंद्र कांबळे मार्ग, वाकोला, सांताक्रुझ (पूर्व) येथे बेकायदेशीर व अनधिकृतरित्या बांधण्यात आलेल्या इमारतीत मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा उघडण्यात आली असून सदर इमारतीत महापालिकने पाणीपुरवठा जोडणी देण्यास नकारही दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बँकेत लॉकरची सुविधा उपलब्ध असून ठेवीदारांचे बँकेत मौल्यवान ठेवी ठेवण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बेकायदेशीर व अनधिकृतपणे उघडण्यात आलेल्या बँकेची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) तसेच ठेवीदारांच्या ठेवीच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६)** :(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वाकोला शाखेची जागा अनधिकृत नाही. बँकेने दादर जनता सहकारी बँक मर्या. (अवसायनात) यांचेकडून दि.२५/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या कायदेशीर लिलावाद्वारे खरेदी केली असून दि.१२/१२/२०१२ रोजी डीड ऑफ ट्रान्सफर केले आहे.

(२) पूर्वी सदर जागेत दादर जनता सहकारी बँक मर्या. (अवसायनात) या बँकेची शाखा कार्यरत होती. त्यावेळी पाण्याचे कनेक्शन होते. परंतु सदर बँक शाखा बरेच वर्ष बंद असल्याने महापालिकेने पाण्याचे कनेक्शन बंद केले होते. बँकेने पाण्याच्या कनेक्शनसाठी पालिका प्रमाणित प्लंबरकडे अर्ज केला असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) ठेवीदाराच्या ठेवी सुरक्षिततेसाठी बँकेत डीआयसीजीसी यांचेमार्फत विमा उतरविण्यात आले आहे.

(६) सदर प्रकरणी कोणालाही जबाबदार धरण्यात आले नाही.

(७) लागू नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात आंबी (नावाडी) समाजाला भटक्या जमातीचे प्रमाणपत्र देण्यात येत नसल्याबाबत**

**(३१) २३२२५ (३०-०७-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आंबी (नावाडी) समाजाला भटक्या जमातीचे प्रमाणपत्र मिळत असताना कोल्हापूर जिल्हयात मात्र सन २०११-१२ पासून दाखले देण्यात येत आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर विभाग जात पडताळणी कार्यालयात सन २०११-१२ पासून २०० हून अधिक दाखले प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मागासवर्ग आयोगाकडून अहवाल क्र. ४९,५० व ५१ शासनास प्राप्त झाला असून त्याबाबत बैठक घेवून आंबी समाजाचा जातीचा दाखल्याचा प्रश्न निकालात काढण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांनी सामाजिक न्याय मंत्री, यांच्याकडे केली आहे, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-१२-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपंग विद्यार्थ्यांना गेल्या तीन वर्षापासून शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नसल्याबाबत**

**(३२) २३६७८ (३०-०७-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुतांश अपंग विद्यार्थ्यांना गेल्या तीन वर्षापासून शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्हयातील सुमारे अडीच कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती अनुदानाची रक्कम थकीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या शिष्यवृत्तीच्या अनुदानाची रक्कम थकीत असण्याची कारणे काय आहेत, व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदरची शिष्यवृत्ती केव्हापर्यंत देण्यात येणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-११-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) पुणे जिल्हयात सन २०१२-१३ करीता रु. ६१.४५ लक्ष सन २०१३-१४ करीता रु २२०.६१ लक्ष, सन २०१४-१५ करीता रु. ४७.१३ लक्ष तसेच सन २०१५-१६ करीता रु ५९.२४ लक्ष इतकी तरतुद शिष्यवृत्ती अनुदानासाठी वितरीत करण्यात आलेली आहे. तथापि, पुणे जिल्हयात ११०० पेक्षा जास्त महाविद्यालये, इंजिनिअरींग, वैद्यकीय व पदवीत्तोर संस्था असल्याने राज्याच्या अन्य भागातून पुणे जिल्हयात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे आणि ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयनुसार शालांत पूर्व आणि शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात आलेली आहे तसेच मागणीपेक्षा कमी तरतुद प्राप्त झाल्यामुळे पुणे जिल्हयातील सुमारे अडीच कोटी इतकी तरतुद थकीत आहे हे खरे आहे. सदरची थकीत रक्कम पुरवणी मागणीद्वारे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील विमुक्त जाती आणि भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घर बांधून देण्याबाबत**

**(३३) २३७८९ (३०-०७-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील विमुक्त जाती आणि भटक्या जमातीचे शासनाच्या यशंवतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर सर्वेक्षण करण्यात येणार असून लाभार्थी कुटुंबाला ५ गुंठे जमीन उपलब्ध करुन देवून त्यावर २६९ चौरस फूटाचे घर बांधून देण्याचे आदेश जिल्ह्यातील तालूका गटविकास अधिकाऱ्यांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान ग्रामसेवकांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच आतापर्यंत किती ग्रामसेवकांनी याबाबतचा अहवाल तयार केलेला आहे असल्यास, या योजनेची प्रत्यक्षात केव्हापासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-१२-२०१५) :**(१) नाही.

५ गुंठे जमीन व २६९ चौरस फुटाचे घर बांधून देण्याचे आदेश कोणत्याही गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामसेवकांना दिलेले नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागामार्फत कार्यरत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रम शाळेत इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत**

**(३४) २४०६१ (३०-०७-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत कार्यरत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळेत इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा या आशयाचे एक पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी, अमरावती यांनी दिनांक २३.०३.२०१५ रोजी वा त्यासुमारास मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेत इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची बाब शासनाचे विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०१-२०१६) :** (१) होय.
(२) विजाभज च्या प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळांमध्ये प्रत्येक इयत्तेत विजाभज विद्यार्थी व्यतिरिक्त १५ अनिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत शासन निर्णय क्र.व्हीएएस-१०९५/प्र.क्र.१५३/मावक-६, दि.४.१२.१९९५ अन्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार विजाभज प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळांमध्ये विजाभज विद्यार्थ्यांबरोबरच अनु. जाती, जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अनिवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्यात येतो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये विकास सेवा सदस्यांकडून रुपये १ ते ३ लाखापर्यंत पीक कर्ज (ऊस) घेणारे सभासदांसाठी संस्था पातळीवर २ टक्के प्रमाणे व्याज आकारणीबाबत**

**(३५) २४२८२ (१९-०८-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये विकास सेवा सदस्यांकडून रुपये १ ते ३ लाखापर्यंत पीक कर्ज (ऊस) घेणारे सभासदांसाठी संस्था पातळीवर २ टक्के प्रमाणे व्याज आकारणी होते व उर्वरित व्याजासाठी महाराष्ट्र शासनाकडून १ टक्के व केंद्र शासनाकडून ३ टक्के सवलत मिळते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशी सवलत देताना नाबार्ड व राज्य शासनाच्या निकषाप्रमाणे सभासदांना पीक कर्ज घेतलेपासून ते ३६५ दिवसाच्या आत पूर्ण फेड केले तर त्यांना अशा सवलतीचा लाभ मिळतो हे खरे आहे का,
(३) असल्यास, ऊस हंगामाचा विचार करता ८० टक्के पेक्षा जास्त ऊसकरी सभासदांचा ऊस गाळप होवून त्याचे ऊस बील मिळण्याचा कालावधी हा ३६५ दिवसांपेक्षा जास्त होतो. त्यामुळे अशा सभासदांना पीक कर्जावर व्याज सवलत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाबार्ड व शासनाने कर्जवसुलीचा ३६५ दिवसाचा निकष रद्द करुन ३० जून ही वसुलीची तारीख निश्चित करुन व्याज सवलतीचा लाभ देणेबाबत मा.सहकारमंत्री महोदय यांना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) नाही.
(४) अशा स्वरुपाचे निवेदन श्री.संजय पुराम, वि.स.स. यांनी दि.३०.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये तसेच श्री.चरण सोविंदा वाघमारे, वि.स.स. यांनी दि.२६.०३.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे अशी मागणी केल्याचे कार्यालयाच्या दप्तरी दिसुन येते.

(५) शासनाने दि.०१.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने राज्यातील शेतकऱ्यांना ऊसपीक कर्जाच्या परतफेडीसाठी चालु आर्थिक वर्षापुरती दि.३० जून, २०१५ ऐवजी दि.१५ ऑगस्ट, २०१५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

---

**राज्यात अतिवृष्टी व गारपीटीमुळे त्रस्त तसेच ५०% आणेवारी असलेल्या शेतकऱ्यांच्या बॅकेतील पीक कर्जाचे पुनरुज्जीवन करण्याबाबत**

**(३६) २४४६९ (०७-०९-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिवृष्टी व गारपीटीमुळे त्रस्त तसेच ५०% आणेवारी असलेल्या शेतकऱ्यांच्या बॅकेतील पीक कर्जाचे पुनरुज्जीवन करुन त्यांना कर्जाची रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने धोरण जाहिर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाचा राज्यातील शेतकऱ्यांना लाभ मिळावा या हेतूने जिल्हयातील अधिकृत बँकेकडून त्यांना या धोरणाच्या अनुषंगाने लाभ देय होत असताना त्यांच्या ७/१२ मध्ये पूर्वीच्या कर्जाच्या रक्कमेची नोंद (बोजा) असताना पुन्हा ना-देय चा उल्लेख असणे आवश्यक असल्याची अट बँकाकडून टाकण्यात येते व त्यांना बँका व पत संस्थाची २४ विविध प्रकारची ना-हरकत प्रमाणपत्रे सादर करावी लागतात व प्रतिवर्षी या कागदपत्रांची पुन्हा-पुन्हा पुर्तता करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे हे धोरण सुलभतेने राबविण्याबाबत तसेच कर्जबाजारी शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) लागु नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना अनुदान मिळत नसल्याबाबत**

**(३७) २४६२८ (३०-०७-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना वेळेवर अनुदान मिळत नसल्याने त्यांची उपासमार होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिपोषण अनुदानाचा दर महागाई निर्देशांकानुसार दरवर्षी सुधारित करण्याचा निर्णय शासनाने २००२ साली घेतला असतानाही आजवर फक्त २ वेळा किरकोळ वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०३-१२-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखालील निवासी आश्रमशाळा, मुला-मुलींचे अनुदानित वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात शासन निर्णय दिनांक २७.०५.२००८ नुसार रु.६००/- वरुन रु.६३०/- इतकी वाढ करण्यात आली होती. तद्नंतर शासन निर्णय दिनांक २९.१२.२०११ नुसार परिपोषण अनुदानात रु.६३०/- वरुन दरमहा दरडोई रु.९००/- इतकी वाढ करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील विभागीय समाज कल्याण मुलांचे वसतिगृहातील अनियमिततेबाबत**

**(३८) २४७४४ (३०-०७-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे विभागीय समाज कल्याण मुलांचे वसतीगृह युनीट १, २, ३ येथील विद्यार्थ्यांनी येथील अनियमतते संदर्भात तक्रारी केल्या होत्या त्या अनुषंगाने स्थानिक जिल्ह्याचे लोकप्रतिनीधी यांनी मा.सामाजिक न्याय मंत्री व प्रधान सचिव यांचेकडे दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी लेखी पत्राद्वारे पाच सदस्यीय समितीने चौकशी करण्याचे पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त चौकशी समितीच्या माध्यमातून चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच चौकशीत दोषी आढळणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व या समितीचा अहवाल शासन सभागृहासमोर ठेवणार काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-१२-२०१५) :**(१) होय.
(२) मा.लोकप्रतिनिधींच्या दिनांक १८.०३.२०१५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन त्याबाबत स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना दिनांक ३१.०३.२०१५ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आयुक्तालय तसेच जिल्हा स्तरावरील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३९) २५०५३ (३०-०७-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य अपंग कल्याण आयुक्तालयात आयुक्त नसल्यामुळे या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर कोणाचाच अंकुश नसल्याने राज्यातील अपंगाची कोणतीच कामे होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्तालय तसेच जिल्हा स्तरावरील रिक्त पदे भरण्याचा प्रस्ताव शासनाने तयार केला आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार सदरची पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार असल्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (०७-०१-२०१६) :**(१) नाही.

आयुक्त अपंगकल्याण पुणे या पदावर नियमित अधिकारी कार्यरत आहेत.

(२) व (३) आयुकत अपंगकल्याण पुणे यांच्या आस्थापनेवरील गट ब संवर्गातील रिक्त पदे शासन स्तरावरुन गट क व ड संवर्गातील रिक्त पदे आयुक्तालय स्तरावरुन भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्ज वसूली मोहिम थांबविण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकाना सूचना देण्याबाबत**

**(४०) २५४०३ (१३-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐन दुष्काळात राष्ट्रीयकृत बँकानी हिंगोली जिल्ह्यात थकबाकी मोहिम वसूली सुरु केली असून यासाठी खासगी वसूली प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता ही कर्ज वसूली मोहिम थांबविण्याबाबत राष्ट्रीयकृत बँकाना सूचना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील बँकामार्फत खरीप हंगामाकरीता कर्जवाटप होत नसल्याबाबत**

**(४१) २५८१५ (१९-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यंदाच्या खरीप हंगामाकरिता शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकामार्फत कर्जवाटप करण्याचा सूचना शासनाकडून देण्यात आल्या असून नागपूर जिल्ह्यातील बँकामार्फत कर्जवाटप होत नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या राष्ट्रीयीकृत बँका कर्जवाटपास दिरंगाई करीत आहेत त्या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच शेतकऱ्यांना तातडीने खरीप हंगामाकरिता कर्जवाटप करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :**(१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) दि.२७.०५.२०१५ रोजीच्या खरीप आढावा सभेमध्ये व दि.२४.०६.२०१५ च्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या सभेमध्ये मा.मुख्यमंत्री महोदय यांनी राज्यातील सर्व बँकांना पीक कर्जवाटप करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. राज्यातील बुलडाणा, वर्धा व नागपूर या आर्थिक अडचणीतील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कार्यक्षेत्रातील सभासद पीककर्ज वाटपापासून वंचित राहू नये याकरीता सहकार विभागामार्फत सन २०१५-१६ च्या हंगामामध्ये विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार पात्र शेतकऱ्यांना कर्जाचे वितरण करणे, पीककर्ज अर्ज व्यापारी बँक शाखेकडे जमा करणे, जिल्ह्यात पीककर्ज मेळावे आयोजित करणे इ.कामकाज करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्धा येथे आदिवासी विकास विभागाचे नवीन स्वतंत्र प्रकल्प कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(४२) २६०६३ (०६-०८-२०१५). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर आदिवासी एकात्मिक प्रकल्प कार्यालयांतर्गत नागपूर व वर्धा या दोन जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र आहे, या प्रकल्प कार्यालयाद्वारे नागपूर जिल्ह्यातील ५ शासकीय आश्रमशाळा, २० अनुदानित आश्रमशाळा व १५ आदिवासी मुलां-मुलीचे वसतीगृह चालविण्यात येते तसेच वर्धा जिल्ह्यातील ६ आदिवासी आश्रमशाळा, ७ अनुदानित आश्रमशाळा व १२ आदिवासी मुलां-मुलीचे वसतीगृह चालविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे संपूर्ण कामकाज नागपूर येथील एकाच प्रकल्प कार्यालयामार्फत सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्धा जिल्ह्यात आठ तालुके असून आदिवासींची लोकसंख्या १ लाख ५४ हजार ४१५ इतकी असून म्हाडा, मिनी म्हाडा अंतर्गत ७५ गावे प्रस्तावित आहेत, हे खरे आहे काय, तसेच, मागील अनेक वर्षापासून वर्धा जिल्ह्यातील आदिवासी जनतेतर्फे तसेच लोकप्रतिनिधींद्वारा वर्धा येथे नवीन आदिवासी एकात्मिक प्रकल्प कार्यालय सुरु करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वर्धा येथे नवीन आदिवासी एकात्मिक प्रकल्प कार्यालय सुरु करण्याकरीता अप्पर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर या कार्यालयाद्वारे पत्र क्र. प्रशा-२००८/प्रक्र./का.४(क)/६५४४ दिनांक २३ डिसेंबर, २००८ रोजी शासनास, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर या कार्यालयाचे विभाजन करुन वर्धा जिल्हा वर्धा येथे आदिवासी विकास विभागाचे नवीन स्वतंत्र प्रकल्प कार्यालय सुरु करण्याबाबत कळविण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, वर्धा येथे नवीन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-१२-२०१५) :**(१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) वर्धा येथे नवीन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय सुरु करण्याबाबतची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

**राजुरा व कोरपणा (जि.चंद्रपूर) येथील प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत**

**(४३) २६४०१ (३१-०७-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा व कोरपना (जि.चंद्रपूर) येथील उद्योगात स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत शासन व कंपनीत करार झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापही प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्यास टाळाटाळ करुन अनियमितता होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निकषाप्रमाणे किती प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नियमित नोकरीत सामावून घेण्यात आले आहे आणि किती वारसांना सामावून घेणे बाकी आहे यांची चौकशी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१५)** :(१), (२), (३) व (४) राजूरा व कोरपना, जि.चंद्रपूर या ठिकाणी औद्योगिक क्षेत्र स्थापना करण्यासाठी ८७९.२० हे.आर. खाजगी व २५.७८ हे.आर सरकारी अशी एकूण ९०४.९८ हे.आर. क्षेत्र अधिसूचित करण्यासंबंधीची अधिसूचना दिनांक ८/१२/२००५ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि सदर क्षेत्रास संबंधित खातेदार व लोकप्रतिनिधी यांचा विरोध असल्यामुळे सदर क्षेत्रासाठी अधिसूचित करण्यात आलेले संपूर्ण क्षेत्र विनाअधिसूचित करण्यासंबंधीची अधिसूचना दिनांक १४/५/२०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे राजुरा व कोरपना येथे सदर औद्योगिक क्षेत्र स्थापन झालेले नसल्याने प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवतनाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दक्षिण सोलापूर तालुक्यातील सावकारांवर सावकारी प्रतिबंधक कायदयाअंतर्गत कारवाई करण्याबाबत

**(४४) २६९८० (१४-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर तालुक्यातील ३१० सावकारी प्रकरणांची माहिती जिल्हा उपनिबंधक यांना देऊनही सावकारी प्रतिबंधक कायदयाअंतर्गत तेथील सावकारांवर कारवाई झाली नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील सावकार कर्जफेड केल्यानंतरही लिहून दिलेल्या जमिनी परत करत नाहीत असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा सावकारांवर सावकारी प्रतिबंधक कायदयाअंतर्गत कारवाई करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०१-२०१६)** :(१) नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) जमीन खरेदी विक्री (स्थावर मालमत्ता) संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर या कार्यालयाकडे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ व त्या खालील नियम २०१४ मधील १७ अन्वये एकूण ८१ दावे दाखल असून त्यावर दिवाणी प्रक्रिया संहीता नुसार पुढील कार्यवाही चालु आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे लिबींचिंचोळी, ता.दक्षिण सोलापूर येथील श्री.शिवाप्पा (शिवानंद) चंद्रशेखर होटगे व श्री.चंद्रशेखर शिवाप्पा होटगे यांच्या निवासस्थानी अवैध सावकारी बाबतचे पुरावे आढळल्याने पोलीस स्टेशन, वळसंग येथे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम ३९, ४१ (ग) अन्वये दि.०४.०७.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
४.प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अचलपूर, अमरावती रस्ता चौपदरीकरणासाठी बालमजुरांना कामाला लावल्याबाबत**

**(४५) २७०७० (१४-०८-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर, अमरावती रस्ता चौपदरीकरण करण्याच्या कामासाठी अल्पवयीन मुलांना कामाला लावण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकामाच विभागाचे अधिकारी यांना याबाबत माहित असून याबाबत कंत्राटदाराने बालमजूर नसल्याचे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालमजूरांना कामावर ठेवणे हे बेकायदेशीर असून याबाबत कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील चिखली स्टेट बँक ऑफ इंडिया यांचेकडून**
**शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्याबाबत**

**(४६) २७३१७ (१९-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनस्तरावरुन शेतक-यांसाठी कर्ज पुनर्गठन करण्यासाठी आदेश असतांना तसेच मा. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी आदेश देवूनही बुलडाणा जिल्ह्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया,चिखली कर्ज पुनर्गठन करण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना कर्जाचे पुनर्गठन होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) नाही, हे खरे नाही. शेतकऱ्यांसाठी कर्ज पुनर्गठन करण्याबाबत शासन निर्णयानुसार मा.जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी तात्काळ पुनर्गठन करण्याबाबत आदेश संबंधित बँकांना दिलेले आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा चिखली या बँकेकडे ३१ मार्च, २०१५ अखेर १६३९ शेतकऱ्यांनी पीक कर्ज पुनर्गठनाकरीता अर्ज केलेले होते

व त्या सर्वांचे पिक कर्ज पुनर्गठन करण्यात आलेले असल्याबाबत शाखा व्यवस्थापक यांनी कळविलेले आहे.
(२) पुनर्गठणासाठी पात्र शेतकऱ्यांचे पिक कर्ज पुनर्गठन तात्काळ करणेबाबत सर्व बँकांना शासनाकडून सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेची पेन्शन लाभधारकांना मिळाली नसल्याबाबत**

**(४७) २७४५१ (३०-०७-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेची पेन्शन माहे मार्च, एप्रिल या दोन महिन्यांपासून आजतागायत लाभधारकांना मिळाली नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पेन्शन न देण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पात्र लाभार्थ्यांना माहे जून, २०१५ पर्यंतचे अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म.गुंज (ता.महागांव, जि.यवतमाळ) सुधाकरराव नाईक सहकारी साखर कारखाना सुरु करण्याबाबत**

**(४८) २७७१३ (२१-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक ३० मार्च, २०१४ चे सुमारास मा.सहकारमंत्री यांनी शेतकरी लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र शिखर बँकेचे अधिकारी यांचे सोबत बैठक घेवून कारखान्याच्या निविदा प्रकाशित करुन एक महिन्याचे आत कारखाना भाडे तत्वावर देण्याचे आदेश दिले असताना महाराष्ट्र राज्य शिखर बँकेने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारखाना सुरु न झाल्यास व आत्महत्याग्रस्त यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड मतदारसंघातील शेतकऱ्यांचा गाळपाविणा पाच लाख मे.टन ऊस शिल्लक राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :**(१) होय, अंशत: खरे आहे. मा. मंत्री (सहकार) महोदय यांनी दिनांक ३० मार्च, २०१४ रोजी घेतलेल्या सभेत दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोली सदर कारखान्याच्या संपूर्ण मालमत्तेचा ताबा घेतलेला असून कारखाना साईटवर त्यांची सुरक्षा एजन्सी ठेवली आहे.
(२) नाही. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड मतदार संघातील शेतकऱ्यांचा ऊस, वसंत सहकारी साखर कारखाना म., पोफाळी व डेक्कन शुगर मिल्स म., मंगरुळ, तसेच नांदेड जिल्ह्यातील साखर कारखान्यांकडून ऊस गाळपासाठी नेला जातो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) २८२१० (३१-१०-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जात पडताळणीची सुमारे ७० हजार प्रकरणे शासनाकडे आजपर्यंत प्रलंबित असल्याने त्यांचा निपटारा माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यंत करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१२-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) जाती दाव्यांच्या काही प्रस्तावांमध्ये कागदपत्रांची कमतरता, अपुरे पुरावे यामुळे संबंधित व्यक्तीकडून पत्रव्यवहार करुन आवश्यक ते पुरावे मागवावे लागतात. शंकास्पद प्रकरणांमध्ये पोलीस दक्षता पथकाकडून चौकशी केली जाते. त्यामुळे प्रकरणे निकाली काढण्यास उशीर होतो.
प्रलंबित प्रकरणांची संख्या व उपलब्ध कर्मचारी वर्ग यांचा समन्वय साधून तसेच अतिरिक्ति कार्यभार देऊन व वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्टील उद्योगात मागणी घटल्याने या उद्योगातील गुंतवणूक धोक्यात आल्याबाबत**

**(५०) ३१०९६ (२२-१२-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्टील उद्योगात ५० टक्क्यापेक्षा जास्त मागणी घटल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणी घटल्याने या उद्योगातील सुमारे ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक धोक्यात आली असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उद्योगाला उभारणी देण्यासाठी विशेष पॅकेज देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०१-२०१६) :**(१) व (२) आंतरराष्ट्रीय स्तरावरील पोलादाच्या किंमती सन २००३ पासून खालावल्या असल्याने राज्यातील स्टील कंपन्यांचे उत्पादन घटले असल्याने त्या अडचणीत आल्याची बाब स्टील रि रोलर्स असोसिएशनने दि.१८/११/२०१५ च्या निवेदनान्वये शासनास केली आहे.
(३) प्रस्तुत स्टील उद्योगाच्या अडचणी ह्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक बाबीमुळे प्रभावित असल्याने त्या राज्य शासनाच्या नियंत्रणाबाहेर आहेत. तथापि, स्टील उद्योगाला राज्यांतर्गत स्तरावर संरक्षण देण्यासाठी प्रवेश कर लादण्यात आला आहे. त्यामुळे शेजारच्या राज्यातील स्टील महाराष्ट्रात येण्यापासून परावृत्त करण्यात येत आहे. तसेच उद्योग क्षेत्रात एक खिडकी योजना, सामुहिक प्रोत्साहन योजना द्वारे चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.